निवडणूक तात्काळ
ई-मेलव्दारे

माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच, नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी <u>तीन टप्प्यांतील</u> निवडणूक कार्यक्रम.

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.१६/का-८
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-२८/०९/२०१५

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय :- माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच, नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी <u>तीन टप्प्यांतील</u> निवडणूक कार्यक्रम.**

**संदर्भ :-** १) आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१४/प्र.क्र.१४/का-८, दि.१२/०१/२०१५ रोजीचा प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम.
२) मतदार यादी कार्यक्रमासंदर्भातील आयोगाची क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.११/का-८, दि.०७/०८/२०१५, दि.२६/०८/२०१५, दि.०५/०९/२०१५ व दि.१६/०९/२०१५ रोजीची निर्देशपत्रे.

महोदय/महोदया,

१.१ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.५७५६/२००५, (श्री. किशनसिंग तोमर विरूध्द अहमदाबाद महानगरपालिका व इतर) या याचिकेमध्ये दि.१९/१०/२००६ रोजी पुढीलप्रमाणे महत्वपूर्ण निवाडा दिलेला आहे.

(अ) राज्य निवडणूक आयोग यांचे अधिकार, शक्ती व दर्जा भारत निवडणूक आयोगाच्या समकक्ष आहेत.

(आ) राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक ती सर्व साधनसामग्री व मनुष्यबळ राज्य शासनाने उपलब्ध करून दणे बंधनकारक आहे.

(इ) राज्य निवडणूक आयोगाने दिलेले निर्देश राज्य शासनावर बंधनकारक आहेत. इत्यादी.

१.२ कायद्याची वरील तरतूद लक्षात घेता निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या वेळी ज्याप्रमाणे कार्यवाही केली जाते त्याप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या वेळी सर्व आवश्यक बाबींवर कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२. **यासंदर्भात आपणास यापूर्वी पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत :-**

२.१ आयोगाच्या दिनांक १२/०१/२०१५ च्या संदर्भाधिन क्रमांक १ च्या पत्रान्वये सन-२०११ च्या जनगणनेची आकडेवारी विचारात घेऊन प्रभाग रचना व आरक्षण इत्यादी कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

२.२ तसेच आयोगाच्या दिनांक१६/०९/२०१५ च्या संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या संबंधित ठिकाणी दिनांक १४/०९/२०१५ व २३/०९/२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

२.३ मतदार यादीतील मयत अथवा स्थानांतरील मतदारांबाबत तसेच दुबार नावांबाबत करावयाची कार्यवाही :-

यासंदर्भात आयोगाच्या क्रमांक:रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५, दि.११/१०/२०१० व दि.०७/०२/२०१२ च्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

३ **निवडणूक कार्यक्रम**

३.१ या आदेशाद्वारे, जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालाप्रमाणे माहे नोव्हेंबर व डिसेंबर - २०१५ या कालावधीमध्ये मुदत संपणाऱ्या व नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींकरीता सार्वत्रिक निवडणुका तीन टप्प्यांत (परिशिष्ट-अ, ब व क मध्ये जिल्हानिहाय ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीची संख्या दर्शविल्याप्रमाणे) जाहीर करण्यात येत आहे.

(i) **परिशिष्ट-ड (टप्पा क्र. १)** :- रायगड, रत्नागिरी, अहमदनगर, नंदुरबार, पुणे, बीड, अकोला व चंद्रपूर या ८ जिल्ह्यांतील सार्वत्रिक व पोट निवडणुकांकरीता **बुधवार दि.२८ ऑक्टोबर, २०१५ रोजी मतदान होणार** आहे.

(ii) **परिशिष्ट-इ** (टप्पा क्र. २) :- ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगांव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया व गडचिरोलीतील सिरोंचा, अहेरी, भामरागड, एटापल्ली, मुलचेरा व चामोर्शी या ६ तालुक्यांसह २६ जिल्ह्यांतील सार्वत्रिक व पोट निवडणुकांकरीता **रविवार दि.०१ नोव्हेंबर,** २०१५ रोजी **मतदान होणार** आहे.

(iii) **परिशिष्ट-ई (टप्पा क्र.३)** :- फक्त गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली, धानोरा, आरमोरी, देसाईगंज (वडसा), कुरखेडा व कोरची या ६ तालुक्यांतील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकीकरीता शुक्रवार दि.०६ **नोव्हेंबर,** २०१५ रोजी **मतदान होणार आहे.**

३.२ **रिक्त पदांची प्रमाणित माहिती संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (ग्रा.पं.) यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर ज्या ग्रामपंचायतींची मुदत समाप्त होण्यास सहा महिन्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक असेल अशा ग्रामपंचायतींतील रिक्त पदे वगळून उर्वरित रिक्त पदांसाठीच या कार्यक्रमांतर्गत पोट निवडणूक घेण्याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.**

३.३ आतापावेतो मुदती संपलेल्या ग्रामपंचायतींच्या न्यायालयीन प्रकरणामुळे सार्वत्रिक निवडणूक/पोट निवडणुका न घेतलेल्या परंतु आता न्यायालयीन निर्णयानंतर निवडणुका घेणे आवश्यक असलेल्या ग्रामपंचायती अथवा इतर अन्य कारणास्तव मुदत संपली असतानाही ज्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका अद्याप घेतलेल्या नाहीत अशा ग्रामपंचायतींतील रिक्त पदे.

३.४ संबंधित ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक तसेच पोट निवडणुकीसंदर्भात प्रभागनिहाय मतदार यादयांमध्ये, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या **क्र.ईएलआर-**

१००४/प्र.क्र.५६५/०४/३३, दि.०८/१२/२००४ चे परिपत्रक तसेच आयोगाच्या दि.२४/०४/२००७ व दि.११/१०/२०१० च्या पत्रात दिलेल्या निदेशांनुसार, सुधारणा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

३.५ आयोगाच्या क्र.रानिआ-१०९७/प्र.क्र.१६६/९७/पंरा, दि.१०/०३/१९९८ च्या पत्रातील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या निर्देशानुसार ज्या ग्रामपंचायतींच्या विभाजनाचे प्रस्ताव कोणत्याही टप्प्यात प्रलंबित आहेत त्या प्रस्तावाचा विचार न करता मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेणे हे भारतीय संविधानातील तरतुदीनुसार आवश्यक आहे. तरी **अशा सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम लावण्यात यावा. या आदेशांचे पालन न चुकता करावे याची विशेष नोंद घ्यावी.**

३.६ सदर निवडणूक कार्यक्रमास गाव, तालुका व जिल्हा पातळीवर स्थानिक प्रसिध्दी माध्यमांमार्फत (स्थानिक वृत्तपत्रे, केबल टि.व्ही. इ.) व्यापक प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी.

३.७ निवडणुकीबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी आयोगाच्या संकेतस्थळावर सूचना पुस्तिका (R.O.Handbook) प्रसिध्द करण्यात आली असून त्यातील निर्देशांनुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

३.८ सोबतच्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे **गडचिरोली** व **गोंदिया जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांकरीता मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० अशी राहील.**

३.९ **तसेच शासनाच्या क्रमांक:व्हीपीएस-११६४/२८६१३/ई, दि.०६ फेब्रुवारी, १९६५ च्या शासन निर्णयानुसार (प्रत संलग्न) बुधवार दि.२८/१०/२०१५ तसेच शुक्रवार दि.०६/११/२०१५ हे मतदानाचे दिनांक कार्यालयीन कामकाजाचा दिवस असल्याने, या दिवशी सार्वत्रिक व पोट निवडणुकीचा कार्यक्रम लागू असलेल्या क्षेत्रात, जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावर मतदानाकरीता स्थानिक सुट्टी जाहीर करावी.**

## ४. निवडणूक विषयक कामकाजासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती

४.१ आयोगाच्या क्रमांक-रानिआ/मनपा २०१५/प्र.क्र.६/का.०५, दि.१०/०२/२०१५ च्या आदेशानुसार ग्रामपंचायतींच्या निवडणूका घेण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी आणि उप जिल्हाधिकारी (सामान्य) (उपजिल्हाधिकारी (सामान्य) यांच्या अनुपस्थितीत निवासी उप जिल्हाधिकारी) **यांची** आहे. **तसेच** यासंदर्भातील संपूर्ण देखरेखीची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्त यांची आहे.

४.२ आयोगाच्या क्रमांक-एसईसी१०९५/३०६/डेस्क३, दि.२ मार्च, १९९५ च्या आदेशानुसार जिल्हाधिकारी हे निवडणुकीच्या कामाकरिता कर्मचारी अधिग्रहीत करण्यास सक्षम प्राधिकारी आहेत.

४.३ आचारसंहिता कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात येऊ नयेत.

४.४ **निवडणुकीच्या कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी / कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर राहतील.**

४.५ **निवडणुकांची सर्व** कामे व्यवस्थित पार पडतील याची **सर्व संबंधितांनी** काळजी घेणे आवश्यक **आहे.** त्यामध्ये जाणीवपूर्वक हयगय झाल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी (जिल्हाधिकारी यांच्यासह) यांच्याविरुध्द उचित कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगास राहतील.

५. **निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण**

जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना निवडणूक कामकाजाची माहिती होण्याकरीता किमान ३ वेळा प्रशिक्षण आयोजित करावेत. त्यामध्ये प्रामुख्याने खालील विषयांचा समावेश करण्यात यावा :-

(i) उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र संगणकामार्फत भरणे.

(ii) ई.व्ही.एम. च्या वापराबाबत.

(iii) आचारसंहितेसंबंधी आयोगाच्या दि.२९/१२/२०११ च्या एकत्रित आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण.

६. **निवडणूक निरीक्षकांशी समन्वय.**

या सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया योग्य रितीने होत आहे किंवा कसे, हे राज्य **निवडणूक** आयोगाच्या वतीने तपासण्यासाठी निवडक जिल्ह्यांसाठी संबंधित विभागीय आयुक्त यांच्याकडून निवडणूक निरीक्षकांच्या नियुक्तीचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत. निवडणूक निरीक्षकांना त्यांची जबाबदारी योग्य रित्या पार पाडणे शक्य व्हावे, यासाठी आवश्यक ती साधनसामग्री त्यांना जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करून द्यावी.

७. **आचारसंहिता**

७.१ **सार्वत्रिक निवडणूक असलेल्या सर्व संबंधित जिल्ह्यांतील ग्रामपंचायतीच्या संपूर्ण क्षेत्रात व पोट निवडणूका असलेल्या ग्रामपंचायतीच्या संबंधित प्रभागाच्या क्षेत्रात आज रोजी रात्री १२.०० वाजल्यापासून आचार संहिता लागू होईल. ही आचारसंहिता त्या-त्या ठिकाणच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील.**

७.२ **निवडणूक आचारसंहितेबाबत आयोगाने दि.२९/१२/२०११ रोजी निर्गमित केलेल्या एकत्रित आदेशानुसार, जिल्हाधिकारी स्तरावर निर्णय घेऊन आचारसंहिता भंगाबाबत तक्रारीची प्रकरणे तातडीने निकाली काढणे अपेक्षित आहे. फक्त अपवादात्मक प्रकरणात आयोगाकडे आचारसंहिता भंगाबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या उचित अभिप्रायासह अशी प्रकरणे सादर करण्यात यावीत.**

८. **नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र सादर करण्याच्या प्रक्रियेच्या संगणकीकरणाबाबत.**

**या निवडणुकांकरीता सर्व संभाव्य उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व घोषणापत्राचा नमुना सहज रितीने व २४ तास उपलब्ध व्हावा यासाठी हा नमुना https://panchayatelection.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.**

८.१ सर्व उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या नामनिर्देशनपत्र व घोषणापत्राचा नमुना भरून त्याचे प्रिंट आऊट **घेऊन** त्यावर स्वाक्षरी करावी. अशी स्वाक्षरी केलेली प्रिंट आऊट नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र म्हणून उमेदवाराने संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. असे भरलेले व सही केलेले नामनिर्देशनपत्र व

घोषणापत्र, विहित नमुन्यातील नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. तथापि नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाची प्रमाणपत्रे स्कॅन करून अपलोड किंवा संगणकीकरण करू नये.

८.२ या आज्ञावलीच्या वापराबाबत काही अडचणी आल्यास आयोगाच्या संगणकीकरण शाखेतील नोडल अधिकारी, श्री. अविनाश सणस तसेच महाऑनलाईनचे प्रतिनिधी श्री. दर्शिल गांधी यांच्याशी परस्पर संपर्क साधावा.

दूरध्वनी क्रमांक :- ०२२ - २२८८६९५०

ई-मेल ॲड्रेस :- avinash.sanas@nic.in

darshil.gandhi@mahaonline.gov.in

८.३ सर्व संभाव्य उमेदवारांना अडचण येऊ नये म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आवश्यकतेप्रमाणे मदत कक्षाची स्थापना करावी.

८.४ तसेच आदेश क्रमांक - एसईसी/जीईएन-२००२/प्र.क्र.८५/का-०५ दिनांक - १५ मार्च,२००४ व दिनांक- ०७ जुलै २००८ अन्वये, उमेदवाराने जंगम मालमत्ता, दोषसिध्दीनंतर झालेली शिक्षा व शिक्षण इ. बाबत घोषणापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना हे घोषणापत्र घेण्याबाबत योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.

९. जात वैधता प्रमाणपत्राबाबत घोषणापत्र.

९.१ महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १०-१ अ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जाती, किंवा अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागासवर्ग (राज्य शासनाने वेळोवेळी घोषित केलेले इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती किंवा अशा वर्गाचे भाग अथवा त्यामधील गट) यांच्याकरीता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून नामनिर्देशनपत्राबरोबर जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेल्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत घेण्यात यावी.

मात्र महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये दिनांक २६ मार्च, २०१५ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ अन्वये केलेल्या दुरूस्तीनुसार, नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी ज्या व्यक्तीने जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, अशा व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत:-

१) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा असा अर्ज केल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि

२) ती व्यक्ती, निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील याबद्दलचे हमीपत्र सादर करेल, असे हमीपत्र जोडून नामनिर्देशनपत्र स्विकारण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतुदीनुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करावी. तसेच शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या दि.३० मार्च, २०१५ च्या अधिसूचनेच्या पत्राची (प्रत संलग्न).

९.२ आयोगाच्या क्रमांक-रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१०/का-६, दि.१० ऑगस्ट, २०१५ च्या आदेशानुसार सर्व उमेदवारांनी (बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारानेसुध्दा) दैनंदिन खर्चाचा हिशोब तसेच निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आंत एकत्रित खर्चाचा तपशिल जिल्हाधिकारी प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्याकडे (तहसिलदार दर्जापेक्षा कमी नसलेल्या) सादर न केल्यास महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १६ नुसार उमेदवारास अनर्ह ठरविता येईल. (सोबत उक्त आदेशाची प्रत संलग्न)

९.३ नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या घोषणापत्रातील कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास आयोगाच्या क्रमांक-रानिआ/नप २०१५/प्र.क्र.५/का.०६, दि.२७/०३/२०१५ च्या पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-५७६/३/२०१३-एसडीआर, दि.३० सप्टेंबर, २०१३ मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून ही बाब संबंधित उमेदवाराच्या तात्काळ लक्षात आणून देणे आवश्यक आहे.

१०. **नामनिर्देशनपत्र मागे घेणे तसेच बिनविरोध निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास विजयी घोषित करण्याबाबत.**

निवडणुकांच्यावेळी उमेदवारी अर्ज भरताना अनेक उमेदवार अर्ज भरतात परंतु नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्यावेळी एक उमेदवार सोडून अन्य उमेदवार अर्ज मागे घेतात. अशावेळी तो उमेदवार **इतर उमेदवारांवर दबाव आणून किंवा प्रलोभन देऊन उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावतो ही शक्यता नाकारता येणार नाही.** त्यामुळे यापुढे असे प्रसंग घडल्यास राज्य निवडणूक आयोगास त्याबाबत सविस्तर अहवाल तात्काळ पाठवावा व **राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे** असे आदेश क्रमांक - रानिआ/मनपा/२००४/प्र.क्र.३७/का-०५, दिनांक - २३/१२/२००४ अन्वये दिलेला आहे त्याचे पालन करावे. तसेच नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम मुदतीची काटेकोरपणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

११. **मतदान केंद्र निश्चिती**

आयोगाने मतदान केंद्र निश्चितीबाबत विहित केलेल्या निकषांनुसार मतदान केंद्र निश्चित करावे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीकरिता मतदाराचे नाव ज्या मतदान केंद्रावर होते त्याच मतदान केंद्रावर शक्यतोवर (मतदान केंद्राची इमारत) ग्रामपंचायतींच्या निवडणुकीमध्ये मतदाराचे नाव राहील यादृष्टीने प्रत्येक मतदान केंद्राला सुमारे ८०० मतदार जोडण्यात यावेत. मतदान केंद्रावरील सर्व सोईसुविधा लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे असतील याची खबरदारी घेण्यात यावी.

१२. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मार्कर पेन यांच्या वापराबाबत.**

१२.१ या निवडणुका इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर घेण्यात येतील. ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या इलेक्ट्रॉनिक **मतदान यंत्राचा वापर करुन** मतदान करण्यासंदर्भातील सविस्तर कार्यपध्दती ठरवून **देण्याबाबतचे आदेश क्रमांक-रानिआ**/२००७/प्र.क्र.०३/का-०८, दि.२९/०३/२००७ **रोजी** महाराष्ट्र **शासन** राजपत्रात **प्रसिध्द** झालेले असून आयोगाचे दि.०४/०४/२००७ चे पत्रान्वये यापूर्वीच पाठविण्यात आले आहे. त्या आदेशानुसार कार्यवाही करावी. तसेच **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान**

यंत्रावर None Of The Above (NOTA) बटनाची सुविधा उपलब्ध करुन दिल्याबाबत आयोगाचे क्र.रानिआ/२०१३/प्र.क्र.११/का-१२, दि.१२/११/२०१३ रोजीचे आदेश व दि. २६/११/२०१३ रोजीचे पुरक आदेशांचे यथोचित पालन करण्यात यावे.

१२.२ मतदाराच्या बोटाला लावावयाच्या मार्कर पेनाच्या वापराबाबत या आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का-५, दि.१९/११/२०११ च्या पत्रातील निर्देशानुसार कार्यवाही करावी. तसेच ही मार्कर पेन वापरण्यायोग्य विहित मुदतीतील असल्याबाबत आपल्या स्तरावर खातरजमा करण्यात यावी.

१३. निवडणूक विषयक अहवाल आयोगास सादर करण्याबाबत.

१३.१ जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिनियम, नियम व निवडणूक नियमांमधील तरतुदीनुसार निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून विहित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रसिध्द करावा. निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्थेसह आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी. निवडणुकीतील टप्पे राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या तारखेस पार पाडावेत व यासंबंधातील माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी. तसेच जिल्हा माहिती अधिकाऱ्यामार्फत सदर माहितीस प्रेस नोटद्वारे स्थानिक पातळीवर प्रसारमाध्यमाद्वारे प्रसिध्दी द्यावी. तसेच प्रत्येक टप्पा पार पाडल्यानंतर त्याबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगास ई-मेलद्वारे सादर करावी.

निवडणुकीसंदर्भातील प्रशासकीय किंवा आयोगासंदर्भातील बातम्यांची कात्रणे दररोज सकाळी आयोगाच्या ई-मेल वर पाठवावीत हे काम जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडून करून घेण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असेल.

१३.२ राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०१/१२/२००४ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्राचा ताबा घेणे, मतदान यंत्रावर जबरदस्तीने मते नोंदविणे, गाळलेल्या मतदाराच्या याद्यातील लोकांना मतदान करू देणे यासारख्या सर्व गैरप्रकारांबाबत राज्य निवडणूक आयोगाला तात्काळ कळविण्याची दक्षता घ्यावी.

१३.३ याबाबत आयोगाकडून निवडणूक कार्यक्रमादरम्यान व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे वेळोवेळी आढावा घेण्यात येईल. उपरोक्त अहवाल उशीरा व चुकीचे झाले असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

१४. निवडणूक कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखाद्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक किंवा प्रभागातील पोट निवडणुकीसंदर्भात न्यायालयाचे स्थगिती किंवा तत्सम आदेश प्राप्त झाल्यास त्याबाबत आपल्या स्तरावर <u>लगेच कार्यवाही करुन</u> त्याप्रमाणे आयोगास तात्काळ सूचित करावे. याबाबतची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल.

१५. **आयोगाने दि.२१/०९/२०१५ च्या आदेशान्वये मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ च्या तरतुदीसंदर्भात आयोगाचे या आधीचे दि.११ नोव्हेंबर, १९९७ चे आदेश अधिक्रमित केलेले आहेत (प्रत संलग्न). त्यानुसार सर्व संबंधिताना सूचित करण्यात यावे.**

**१६. कोणत्याही प्रकारे निवडणूक प्रक्रियेशी संबंधित चुका किंवा व्यत्यय होणार नाही व निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे** नि:पक्षपातीपणे व रितसर पार पाडली जाईल याची दक्षता घ्यावी. याबाबत कोणत्याही प्रकारची चूक झाल्यास अथवा जाणीवपूर्वक नियमबाह्य कृती केल्याचे आढळल्यास संबंधितांविरुध्द आयोगाचे परिपत्रक दिनांक - ०२/०८/२००६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारवाई केली जाईल.

१७. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| संकेतस्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी कमांक | ०२२-२२८८६९५० / २२८४६७२० |
| ई मेल ॲड्रेसेस | stateelectioncommission@gmail.com |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या वर नमूद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

(के.सूर्यकृष्णमूर्ती)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत- परिशिष्टे - अ, ब, क, ड, इ आणि ई

प्रत : १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, वित्त विभाग, सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
यांना कळविण्यात येते की,जिल्हाधिकारी यांच्या मागणीनुसार त्यांना निवडणूक साहित्य वापरण्यास कृपया परवानगी देण्यात यावी.

४. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**५. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**त्यांना कळविण्यात येत आहे की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करून त्यांना तात्काळ उपलब्ध करून द्यावे.**

६. विभागीय आयुक्त ( सर्व ) यांच्याकडे उचित कार्यवाहीसाठी.

**७. संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.**
**त्यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहीत वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.**

८. पोलीस महानिरीक्षक ( सर्व ), महाराष्ट्र राज्य.

९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व संबंधित )

१०. जिल्हा पोलिस अधिक्षक ( सर्व संबंधित )

११. सहायक आयुक्त, कार्यासन-१२, रानिआ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

१२. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, यांना उचित कार्यवाहीसाठी.

१३. राज्य निवडणूक आयोगाची सर्व कार्यासने

१४. निवड नस्ती ( २ प्रती )

<u>टप्पा क्र.१</u>

*(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.१६/का-८, दि.२८/०९/२०१५ च्या पत्रासोबतचे सहपत्र)*

**परिशिष्ट-ड (टप्पा क्र.१ साठी-मतदान दि.२८/१०/२०१५)**

**राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेला माहे नोव्हेंबर व डिसेंबर - २०१५ मध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या रायगड, रत्नागिरी, अहमदनगर, नंदुरबार, पुणे, बीड, अकोला व चंद्रपूर या ८ जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.**

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम,१९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) अन्वये राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाची प्रत व पोट नियम (२) नुसार नमुना अ अ मधील **निवडणुकीची नोटीस** प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.२८/०९/२०१५ (सोमवार) |
| २ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) अन्वये **नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा** दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.०७/१०/२०१५ (बुधवार) ते दि.१३/१०/२०१५ (मंगळवार) स. ११.०० वाजेपासून ते दु. ४.०० वाजेपर्यंत (शनिवार दि.१० व रविवार दि. ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी कार्यालयीन सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत.) |
| ३ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (ब) नुसार नामनिर्देशनपत्र **छाननी** करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१४/१०/२०१५ (बुधवार) स.११.०० वा. पासून |
| ४ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (क) नुसार **नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम** दिनांक व वेळ (नमुना अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१६/१०/२०१५ (शुक्रवार) स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.१६/१०/२०१५ (शुक्रवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (ड) नुसार आवश्यक असल्यास **मतदानाचा दिनांक** | **दि.२८/१०/२०१५ (बुधवार) स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत** |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.२९/१०/२०१५ (गुरुवार) |
| ८ | मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम,३७ नुसार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दि.३०/१०/२०१५ (शुक्रवार) |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशाप्रमाणे,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.१६/का-८, दि.२८/०९/२०१५ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

**परिशिष्ट-इ (टप्पा क्र.२ साठी-मतदान दि.०१/११/२०१५)**

**राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेला माहे नोव्हेंबर व डिसेंबर - २०१५ मध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगांव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया व गडचिरोलीतील सिरोंचा, अहेरी, भामरागड, एटापल्ली, मुलचेरा व चामोर्शी या ६ तालुक्यांसह २६ जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.**

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम,१९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) अन्वये राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाची प्रत व पोट नियम (२) नुसार नमुना अ अ मधील **निवडणुकीची नोटीस** प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.०१/१०/२०१५ (गुरूवार) |
| २ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) अन्वये नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा **व सादर करण्याचा** दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१३/१०/२०१५ (मंगळवार) ते दि.१७/१०/२०१५ (शनिवार) वेळ स. ११.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत |
| ३ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (ब) नुसार नामनिर्देशनपत्र **छाननी** करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१९/१०/२०१५ (सोमवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून |
| ४ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (क) नुसार **नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम** दिनांक व वेळ (नमुना अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.२१/१०/२०१५ (बुधवार) स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.२१/१०/२०१५ (बुधवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (ड) नुसार आवश्यक असल्यास **मतदानाचा दिनांक** | **दि.०१/११/२०१५ (रविवार) स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत (गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यासाठी स.७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत)** |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.०३/११/२०१५ (मंगळवार) |
| ८ | मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम ३७ नुसार **ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक** | दि.०४/११/२०१५ (बुधवार) |

**मा. राज्य** निवडणूक आयुक्त यांच्या आदेशाप्रमाणे,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

*(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.१६/का-८, दि.२८/०९/२०१५ च्या पत्रासोबतचे सहपत्र)*

**परिशिष्ट-ई (टप्पा क्र.३ साठी-मतदान दि.०६/११/२०१५)**

**राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेला माहे नोव्हेंबर व डिसेंबर - २०१५ मध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या फक्त गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली, धानोरा, आरमोरी, वडसा, कुरखेडा व कोरची या ६ तालुक्यांतील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.**

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम,१९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) अन्वये राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाची प्रत व पोट नियम (२) नुसार नमुना अ अ मधील **निवडणुकीची नोटीस** प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.०१/१०/२०१५ (गुरूवार) |
| २ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) अन्वये **नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक** व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१६/१०/२०१५ (शुक्रवार) ते दि.२१/१०/२०१५ (बुधवार) वेळ स. ११.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत (दि.१८ ऑक्टोबर, २०१५ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत.) |
| ३ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (ब) नुसार नामनिर्देशनपत्र **छाननी** करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.२३/१०/२०१५ (शुक्रवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून |
| ४ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (क) नुसार **नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ** (नमुना अअ मध्ये नमूद केलेल्या **ठिकाणी**) | दि.२७/१०/२०१५ (मंगळवार) स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.२७/१०/२०१५ (मंगळवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (ड) नुसार आवश्यक असल्यास **मतदानाचा दिनांक** | **दि.०६/११/२०१५ (शुक्रवार) स.७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत.** |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.०७/११/२०१५ (शनिवार) |
| ८ | मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम,३७ नुसार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा **अंतिम दिनांक** | दि.०९/११/२०१५ (सोमवार) |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशाप्रमाणे,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.१६/का-८, दि.२८/०९/२०१५ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

परिशिष्ट - अ (टप्पा क्र. १ साठी - मतदान दि. २८/१०/२०१५)

**रायगड, रत्नागिरी, पुणे, नंदुरबार, अहमदनगर, बीड, अकोला व चंद्रपूर या ८ जिल्ह्यांतील माहे नोव्हेंबर व डिसेंबर -२०१५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हानिहाय तपशिल.**

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सार्वत्रिक निवडणूक असलेल्या ग्रा.पं. ची संख्या |
|---|---|---|---|
| १ | **कोकण** | रायगड | ४८ |
| २ | | रत्नागिरी | १० |
| ३ | **पुणे** | पुणे | ४७ |
| ४ | **नाशिक** | नंदुरबार | २३ |
| ५ | | अहमदनगर | ११ |
| ६ | **औरंगाबाद** | बीड | २३ |
| ७ | **अमरावती** | अकोला | १५ |
| ८ | **नागपूर** | चंद्रपूर | १२ |
| **एकूण** | | | **१८९** |

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.१६/का-८, दि.२८/०९/२०१५ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

परिशिष्ट - ब (टप्पा क्र. २ साठी - मतदान दि. ०१/११/२०१५)

**ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगांव, सातारा, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, नांदेड, परभणी, उस्मानाबाद, जालना, लातूर, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, बुलडाणा, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया व गडचिरोली (भाग-१) या २६ जिल्ह्यांतील माहे नोव्हेंबर व डिसेंबर - २०१५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हानिहाय तपशिल.**

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सार्वत्रिक निवडणूक असलेल्या ग्रा.पं. ची संख्या |
|---|---|---|---|
| १ | **कोकण** | ठाणे | ११३ |
| २ | | पालघर | ० |
| ३ | | सिंधुदुर्ग | ० |
| ४ | **नाशिक** | नाशिक | ४४ |
| ५ | | धुळे | ० |
| ६ | | जळगांव | ४ |
| ७ | **पुणे** | सातारा | १७१ |
| ८ | | सोलापूर | ५२८ |
| ९ | | सांगली | ५४ |
| १० | | कोल्हापूर | ६ |
| ११ | **औरंगाबाद** | औरंगाबाद | २३ |
| १२ | | नांदेड | ६११ |
| १३ | | परभणी | ३८ |
| १४ | | उस्मानाबाद | ७ |
| १५ | | जालना | ४८२ |
| १६ | | लातूर | ६ |
| १७ | | हिंगोली | ३० |
| १८ | **अमरावती** | अमरावती | ५ |
| १९ | | यवतमाळ | ३ |
| २० | | बुलडाणा | ६ |
| २१ | | वाशिम | २ |
| २२ | **नागपूर** | नागपूर | ० |
| २३ | | वर्धा | ५ |
| २४ | | भंडारा | ० |
| २५ | | गोंदिया | १ |
| २६ | | गडचिरोली (*सिरोचा, अहेरी, भामरागड, एटापल्ली, मुलचेरा व चामोर्शी या सहा तालुक्यांसाठी*) | १५ |
| **एकूण** | | | **२१५४** |

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.१६/का-८, दि.२८/०९/२०१५ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

परिशिष्ट - क (टप्पा क्र. ३ साठी - मतदान दि. ०६/११/२०१५)

**गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली, धानोरा, आरमोरी, देसाईगंज (वडसा), कुरखेडा व कोरची या ६ तालुक्यांतील माहे नोव्हेंबर व डिसेंबर -२०१५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हानिहाय तपशिल.**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | सार्वत्रिक निवडणूक असलेल्या ग्रा.पं. ची संख्या |
|---|---|---|---|
| १ | गडचिरोली (भाग-२) | गडचिरोली | ० |
| २ | | धानोरा | १ |
| ३ | | आरमोरी | ० |
| ४ | | देसाईगंज (वडसा) | ० |
| ५ | | कुरखेडा | ३ |
| ६ | | कोरची | ५ |
| एकूण | | | ९ |

महानगरपालिका, नगर परिषदा, **नगरपंचायती,**
जिल्हा परिषदा, पंचायत **समित्या व**
ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक / पोट
निवडणुकांमध्ये उमेदवाराने केलेल्या **खर्चाचा**
हिशेब सादर न केल्यास अनर्ह ठरविण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

**क्रमांक- रानिआ/नप-२०१५/प्र.क्र. १०/का-६,**
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई :- ४०० ०३२
दिनांक - १० ऑगस्ट, २०१५.

संदर्भ :- १) क्र.एसईसी-१०९५/१०१/कार्या-३, दि.०७/०२/१९९५ चे आदेश.
२) क्र.एसईसी-१०९५/१०१/कार्या-३, दि.२१/०४/१९९५ चे आदेश.
३) क्र.रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५, दि.३०/०७/२०११ चे आदेश.
४) क्र.रानिआ/नप-२००९/प्र.क्र.१३/का.५ व ६, दि.५/६/२०१० चे आदेश.
५) क्र.रानिआ/जिपपंस-२०१०/प्र.क्र.९/का.७, दि.१९/११/२०१० चे आदेश.

## आदेश

ज्याअर्थी, -

(i) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकाचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

(ii) राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा, खर्च सादर करण्याचा कालावधी आणि पध्दत दि. ७ फेब्रुवारी, १९९५ मध्ये निश्चित केली असून खर्चाच्या मर्यादेमध्ये वेळोवेळी सुधारणा केलेली आहे. सध्या खर्चाची मर्यादा दि.३०/०७/२०११ च्या आदेशाप्रमाणे वापरण्यात येते.

(iii) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एमईसी-१०९५/१०१/कार्या-३, दि. ७ फेब्रुवारी, १९९५ अन्वये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाची माहिती निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात सादर करणे बंधनकारक आहे.

(iv) उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि रितीने देण्यात कसूर केली तर महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींकरिता त्याला तीन वर्षाच्या कालावधीकरिता व जिल्हा परिषदा, पंचायत

समित्या व ग्रामपंचायतींकरिता पाच वर्षाकरिता अनर्ह ठरविण्याबाबतची तरतूद केलेली आहे. अनर्ह ठरविण्याचे अधिकार महानगरपालिकांकरिता विभागीय आयुक्त आणि नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींकरिता जिल्हाधिकारी यांना दि. ५ जून, २०१० व दि. १९ नोव्हेंबर, २०१० च्या आदेशान्वये प्रदान करण्यात आलेले आहेत. (सक्षम अधिकारी)

(v) सक्षम अधिकाऱ्याने उमेदवारास अनर्ह ठरविल्यानंतर महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींकरिता अनर्ह झालेले उमेदवार राज्य निवडणूक आयुक्त यांच्याकडे व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींकरिता विभागीय आयुक्त यांच्याकडे अपिल दाखल करु शकतात.

आणि ज्याअर्थी राज्य निवडणूक आयोगाच्या खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत, -

(i) निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाबाबतचे विवरणपत्र उमेदवार वेळीच सादर करत नाहीत.

(ii) विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी उमेदवारांना अनर्ह ठरविण्याबाबतचे आदेश अनेक वेळा विलंबाने काढतात.

(iii) नगरपरिषदा / नगरपंचायतींमध्ये अनर्ह ठरविण्याचे आदेश संबंधित जिल्हाधिकारी यांचे असून अपिल थेट राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे आहे. (याउलट जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींकरिता सक्षम अधिकारी जिल्हाधिकारी असून अपिल विभागीय आयुक्त यांच्याकडे आहे.)

आणि ज्याअर्थी,

वरील कारणांमुळे निवडणूक खर्च विहित कालावधीत व रितीने सादर न करणा-या उमेदवारांना वेळीच अनर्ह ठरविले जात नाही.

त्याअर्थी,

(i) निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाबाबत माहिती संबंधित उमेदवाराने वेळीच सादर करणे, आणि

(ii) विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना वेळीच अनर्ह ठरविणे.

या दोन बाबींकरिता राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए (४),महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९अ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ

**करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश लक्षात घेता खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-**

## आदेश

(i) निवडणुकांच्या नामनिर्देशनपत्रासोबत संबंधित उमेदवार यांचेकडून सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-१** नुसार हमीपत्र घेण्यात यावे.

(ii) या आदेशाच्या दिनांकापासून अनर्ह ठरविणे व अपिलावर निर्णय घेण्याचे अधिकार खालीलप्रमाणे राहतील:-

(अ) निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून संबंधित उमेदवारांनी ३० दिवसांच्या आत खर्चाचा हिशोब विहित रितीने सोबतच्या **परिशिष्ट-२** मधील रकाना क्रमांक (३) मध्ये नमूद केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करावा.

(ब) खर्चाचा हिशोब विहित मुदतीत व रितीने सादर न करणा-या उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार रकाना क्रमांक- (४) मध्ये नमूद सक्षम अधिकारी यांना राहतील. त्यांनी अनर्हतेसंबंधीचा निर्णय सर्वसाधारणपणे कमाल ३ महिन्यांत घ्यावा.

(क) सक्षम अधिकारी यांनी अनर्ह ठरविल्याच्या आदेशाविरुध्द संबंधित उमेदवारास अनर्ह ठरविल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रकाना क्रमांक-(५) मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल.

(ड) अपिलीय अधिकारी यांनी सर्वसाधारणपणे १ महिन्यात अपिलावर निर्णय घ्यावा.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(ध.मा.कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. संचालक, नगरपालिका प्रशासन, संचालनालय, वरळी, मुंबई
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व महानगरपालिका आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी
६. सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे संबंधित तहसिलदार तथा प्रशासक / मुख्याधिकारी
७. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
८. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
९. निवड नस्ती

# परिशिष्ट-१

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र. १०/का-६, दि. १०/०८/२०१५ सोबतचे)

# हमीपत्र

मी * श्री/श्रीमती .................................................................... (स्वत:चे नाव) श्री ............................ *वडिलांचे/पतीचे नाव यांचा /यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ...... **वर्षे**, राहणार ................................ (पत्ता) खालीलप्रमाणे हमीपत्र करतो/करते की,

१. मी.............................................................* महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायत/जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत निवडणुकीसाठी * प्रभाग / निवडणूक विभाग / निर्वाचक गण क्रमांक.......मधून या................(**जागेचे** नाव असल्यास) जागेकरिता नामनिर्देशनपत्र सादर करीत आहे.

२. मी दररोजच्या निवडणूक खर्चाचा हिशोब दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० **वाजेपर्यंत सादर** करावयाची हमी घेतो / घेते.

३. मी निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत विहित शपथपत्रासह निवडणूक खर्चाचा सविस्तर हिशोब सादर करून त्याची पोचपावती घेण्याची हमी या हमीपत्राद्वारे देत आहे.

४. निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत निवडणूक खर्चाचा हिशोब विहिती पध्दतीने सादर करण्यास कसूर केल्यास मी महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत / जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य राहण्यास निरर्ह / अपात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

(उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा)

स्थळ :

दिनांक :

* आवश्यक नसलेला मजकूर खोडावा.

# परिशिष्ट-२

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र. १०/का-६, दि. १०/०८/२०१५)

| अ. क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | खर्चाचा हिशोब कोणास सादर करावयाचा आहे. (प्राधिकृत अधिकारी) | खर्चाचा हिशोब विहित मुदतीत व रितीने सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह ठरविण्यास सक्षम अधिकारी | अनर्ह ठरविल्याच्या आदेशाविरुध्द अपिल कोणाकडे दाखल करता येईल?. |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | महानगरपालिका | महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला महानगरपालिका उपायुक्त यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी | विभागीय आयुक्त | आयुक्त, राज्य निवडणूक आयोग |
| २ | नगर परिषद, नगर पंचायती | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला उपजिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी (जिल्हयाकरिता एक) | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ३ | जिल्हा परिषद, पंचायत समिती | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला उपजिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी (जिल्हयाकरिता एक) | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ४ | ग्रामपंचायत | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला तहसिलदार यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी (आवश्यकतेप्रमाणे प्रत्येक तहसीलकरिता एक) | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |

**निवडणूक तात्काळ**

**मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ संदर्भातील आयोगाचे दि.११ नोव्हेंबर, १९९७ चे निर्देश पत्र अधिक्रमित करून सुधारीत आदेश निर्गमित करण्याबाबत.**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.१८/का-८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१/०९/२०१५.

वाचा :- १) मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ
२) राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक:रानिआ-१०९७/प्र.क्र.१७७/९७/पंरा, दि.११ नोव्हेंबर,१९९७ चे पत्र.

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के अन्वये राज्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे, आणि

ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ च्या तरतुदीनुसार निवडणूक लढविणारा उमेदवार मरण पावल्यास उमेदवाराच्या मृत्यूबाबत खात्री झाल्यानंतर मतदानासंबंधी प्रत्यादेश दिला पाहिजे अशी तरतूद आहे, आणि त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ-१०९७/प्र.क्र.१७७/९७/पंरा, दिनांक ११ नोव्हेंबर, १९९७ नुसार नियम १४-अ बाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत त्या प्रभागाच्या निवडणुकीबाबत मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ नुसार मतदानासंबंधी प्रत्यादेश दिला पाहिजे आणि त्या प्रभागाच्या निवडणुकीसंबंधातील कामकाज सर्व बाबतीत नवीन निवडणूक असल्याप्रमाणे नव्याने सुरु करण्यात आले पाहिजे अशा सूचना दिल्या आहेत, आणि

ज्याअर्थी, मूळ तरतुदीनुसार सामायिक मतपत्रिकेच्या बाबतीत एका उमेदवाराचा मृत्यू झाल्यास संपूर्ण मतपत्रिका बदलावी लागत असल्यामुळे दिनांक ११ नोव्हेंबर, १९९७ चे दिलेले आदेश त्यावेळी योग्य होते. मात्र २००६ च्या नियमातील सुधारणांनुसार प्रत्येक प्रभागातील प्रत्येक वर्गवारीकरीता वेगवेगळी आणि वेगवेगळ्या रंगाची मतपत्रिका असेल अशी तरतूद करण्यात

आल्याने एखाद्या प्रभागातील एखाद्या प्रवर्गातील उमेदवाराचा मृत्यू झाल्यास फक्त त्या प्रवर्गाच्या त्या जागेपुरता निवडणुकीचा प्रत्यादेश देणे शक्य आहे, आणि

ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ च्या तरतुदीस अधिन राहून, राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ-१०९७/प्र.क्र.१७७/९७/पंरा, दिनांक ११ नोव्हेंबर, १९९७ नुसार दिलेल्या सूचना रद्द करून नव्याने सूचना देणे आवश्यक झाले आहे,

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के अन्वये प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग यासंदर्भात यापूर्वी काढलेल्या सूचनांचे अधिक्रमण करून खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

"ग्रामपंचायत सार्वत्रिक / पोट निवडणुकीच्या प्रक्रियेत मतदानापूर्वी संबंधित प्रभागातील ज्या प्रवर्गातील उमेदवाराचा मृत्यू झाला असेल, त्या प्रवर्गाच्या फक्त त्या जागेच्या निवडणुकीबाबत मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम,१९५९ मधील नियम १४-अ नुसार मतदान स्थगित करण्याबाबत प्रत्यादेश दिला पाहिजे व त्या प्रवर्गाच्या फक्त त्या जागेच्या निवडणुकांसबंधातील कामकाज उक्त नियम १४-अ मध्ये नमूद केलेल्या परंतुकांसह सर्व बाबतीत नव्याने सुरू करण्यात आले पाहिजे."

हे आदेश पारित झाल्याच्या दिनांकानंतरच्या सर्व सार्वत्रिक व पोट निवडणुकांकरीता लागू राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र